प्रकरण सात

# पुर्वेकडील प्रश्न (१८१४-१९१४)

I) ऑटोमन साम्राज्य

II) ग्रीक स्वातंत्र्य युद्ध

III) क्रिमियन युद्ध

IV) बर्लिन परिषद (काँग्रेस)

V) तरुण तूर्कांची क्रांती

VI) बाल्कन युद्धे

" युरोपातून तुर्की साम्राज्याचे जे हळूहळू पतन घडून आले त्यामुळे जी सत्तेची पोकळी निर्माण झाली ती भरुन काढण्याचा प्रश्न म्हणजे पुर्वीय प्रश्न."

– इतिहासकार मिलर

१९व्या शतकाच्या इतिहासातील घटनांपैकी 'पूर्वकडील प्रश्न' ही एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. सत्तेचा समतोल राखण्यासाठी युरोपातील बड्या राष्ट्रांनी या प्रश्नाकडे जातीने लक्ष पुरविले होते. १९ व्या शतकाअगोदर हा प्रश्न उपस्थित झाला नाही. कारण या परिसरात शक्तीशाली ऑटोमन साम्राज्याची सत्ता होती. हा परिसर बाल्कन प्रदेश म्हणून ओळखला जात होता. युरोपखंडातील पूर्वेकडील प्रदेश काळा समुद्र आणि भूमध्य समुद्र यांच्या मधला डॅन्युब नदीच्या दक्षिणेकडील युरोप खंडातील डोंगर पर्वत रागांच्या या प्रदेशाला 'बाल्कन प्रदेश' असे म्हणतात. 'बाल्ख' या तुर्की शब्दाचा अर्थ पर्वत असा होतो. या प्रदेशात अनेक पर्वतरांगा असल्यामुळे त्याला बाल्कन या नावाने ओळखत होते.

## पुर्वेकडील प्रश्नाचा अर्थ :-

१७ व्या शतकाच्या उत्तरार्धात ऑटोमन साम्राज्याच्या पतनाला सुरुवात

झाली. त्याचा फायदा घेऊन ऑस्ट्रिया आणि रशिया यांनी ऑटोमन साम्राज्यावर हल्ले करण्यास सुरुवात केली. रशियाची सम्राज्ञी कॅथेराईनने तुर्कस्थानाचा पराभव केला. आणि ऑटोमन साम्राज्यातील काळ्या समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेश जिंकून रशियाच्या साम्राज्याला जोडला. तसेच ऑटोमन साम्राज्यातील कॉनस्टॅंटीनोपल येथील ख्रिस्ती लोकांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याचाही अधिकार रशियाला मिळाला. ऑस्ट्रिया आणि रशिया यांनी संधी मिळेल तेव्हा ऑटोमन साम्राज्याचे लचके तोडण्यास सुरुवात केली. याशिवाय युरोपातील राष्ट्रवादी चळवळीचा प्रभाव पडून १९ व्या शतकात ऑटोमन साम्राज्यातील लोकांनी तुर्कीच्या जुलमी राजवटी विरुद्ध उठाव करुन स्वतंत्र होण्यास सुरुवात केली. त्यामुळे ऑटोमन साम्राज्याचे तुकडे पडून अनेक स्वतंत्र राष्ट्रांचा उदय झाला. युरोपखंडातील या स्वातंत्र्य आंदोलनात रशिया आणि ऑस्ट्रिया यांनी हस्तक्षेप करण्याचे व बाल्कन प्रदेशात आपले वर्चस्व वाढवण्याचे धोरण स्वीकारले. त्यामुळे रशिया आणि ऑस्ट्रियाचे सामर्थ्य वाढून त्यांच्यापासून युरोपला धोका निर्माण होऊ नये म्हणून इंग्लंड आणि फ्रान्स हेही प्रयत्नशील होते. युरोपातील या बड्या देशांच्या पूर्वेकडील राजकीय हस्तक्षेपामुळे युरोपच्या राजकारणात अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले. या पूर्वेकडील राजकीय समस्यांनाच पूर्वेकडील प्रश्न (Eastern Question) म्हणतात.

## I) ऑटोमन साम्राज्य

**१) ऑटोमन साम्राज्यपूर्वीचा तुर्कस्थान –** आशिया आाणि युरोप या दोन्ही खंडात तुर्कस्थानचा प्रदेश आहे. परंतु तुर्कस्थान स्वतः युरोपियन देश समजतो. तुर्कस्थानच्या इतिहासाचे तीन कालखंड पडतात.

- ऑटोमन साम्राज्यापूर्वीचा प्राचीन कालखंड
- ऑटोमन साम्राज्याचा काळ
- प्रजासत्ताक तुर्कस्थान किंवा आधुनिक कालखंड

तुर्कस्थान प्राचीनकाळी इराणच्या अधिपत्त्याखाली होता. त्यानंतर अलेक्झांडरकडे आणि त्याचा मृत्युनंतर इ.स.पूर्व १३३ मध्ये हा प्रदेश रोमन साम्राज्याच्या अधिपत्त्याखाली आला. रोमन साम्राज्याची पूर्व आणि पश्चिम अशा दोन साम्राज्यात फाळणी झाल्यावर सम्राट कॅनस्टंटीन यांनी आपली राजधानी कॉनस्टांटिनोपल येथे प्रस्थापित केली. तसेच आशिया मायनरमध्ये बायझंटीन

## प्रकरण आठवे

# पहिले जागतिक महायुद्ध

I) पहिले जागतिक महायुद्ध – कारणे आणि परिणाम
II) राष्ट्रसंघ– ध्येय, संघटना, कार्य, अपयश

---

''आम्ही लढत आहोत ते परिणामी जगात शांतता नांदावी आणि जर्मन जनतेसह सर्व लोक मुक्त व्हावेत म्हणून, राष्ट्र लहान असो की मोठे, त्याला आणि सर्व लोकांना आपल्या जीवनाचा व शासनाचा जो मार्ग पसंत असेल तो निवडण्याचा अधिकार असावा म्हणून, लोकसत्तेला जगात निर्भयपणे वावरता यावयास हवे म्हणून.''

– वुड्रो विल्सन

## I ) पहिले जागतिक महायुद्ध :-

### ▸ पार्श्वभूमी :–

पहिल्या जागतिक महायुद्धाला केवळ बाल्कन प्रश्न व त्यामध्ये ऑस्ट्रिया आणि सर्बिया यांच्यात निर्माण झालेले शत्रुत्वच कारणीभूत नव्हते, तर इतर अनेक कारणेही ह्या महायुद्धास कारणीभूत झाली आहेत. विसाव्या शतकाच्या प्रारंभी युरोपात जी परिस्थिती निर्माण झाली होती, तिचा जर आपण बारकाईने अभ्यास केला, तर त्यातच आपणास ह्या महायुद्धाची बाजे पेरलेली दिसून येतील. विसाव्या शतकाच्या प्रारंभी संपूर्ण युरोप दोन परस्परविरोधी सशस्त्र गटात विभागलेला होता. संयुक्त युरोप विरुद्ध त्रिपुटी संघ असे दोन तट युरोपेच्या राजकारणात एकमेकांविरुद्ध उभे ठाकले. बिस्मार्क जोपर्यंत अधिकारावर होता, तोपर्यंत त्याने मोठ्या मुत्सद्देगिरीने व चाणाक्षपणाने युरोपातील परस्परविरोधी अनेक राष्ट्रे एकत्रित

केले. त्यानुसार सप्टेंबर १९१९ मध्ये ऑस्ट्रियाशी सेंट जर्मेनचा तह, नोव्हेंबर १९१९ मध्ये बल्गेरियाशी न्युलीचा तह, हंगेरीशी ट्रायनॉनचा तह, आणि तुर्कस्थानशी १९२० मध्ये सेव्हर्सचा तह असे तह करण्यात आले.

## क) पहिल्या जागतिक महायुद्धाचे परिणाम :-

**१) जीवित व वित्तहानी** – पहिले महायुद्ध हे जगाच्या विस्तृत भागात लढले गेले. त्याची व्याप्ती जमीन, आकाश व पाणी या तिन्ही ठिकाणी होती. या महायुद्धात सुमारे साडेसहा कोटी सैनिकांनी भाग घेतला होता. त्यापैकी १ कोटी ३० हजार सैनिक रणागंणावर मारले गेले. २ कोटी २० हजार सैनिक जखमी झाले. सुमारे ७० हजार सैनिक अपंग झाले. काही बेपत्ता झाले. युद्धानंतरची रोगराई, महागाई, जीवनातील वैफल्य यामुळे ५० लक्ष लोकांवर वाईट परिणाम घडून आले. युद्धासाठी चार वर्षात २७००० कोटी पौंड खर्च झाला. त्यापैकी एकट्या जर्मनीने ४००० कोटी पौंड खर्च केला. ४ वर्ष ११ महिने हे युद्ध लढले गेले.

**२) चिरंतन मुल्ये धुळीला मिळाले** – युद्धामुळे सामान्य माणूस भरडला गेला. जुनी ध्येयें, श्रद्धा आणि जीवनमुल्ये पार धुळीला मिळाली. युद्धामुळे माणसाच्या चिरंतन मुल्यांवरील विश्वास उडाला. त्यामुळे युद्धानंतर निर्माण झालेली नवीन पिढी अश्रद्ध, चैनी, विलासी, बेदरकार व जुन्या पिढीचा तिरस्कार करणारी अशाप्रकारची बनली. बंडखोरी, उर्मटपणा, भ्रष्टाचार, क्रूरता इत्यादी गोष्टी वाढल्या. कुटुंब पद्धती उद्ध्वस्त झाली.

**३) आर्थिक दुष्परिणाम** – या महायुद्धामुळे सर्व युरोपची अर्थव्यवस्था कोलमडून पडली. कारखाने व उत्पादनाची साधने विस्कळीत झाली. आंतरराष्ट्रीय सुवर्ण परिमाण व प्रत्येक राष्ट्रातील सुवर्ण परिमाण ही चलन व्यवस्था नष्ट होऊन, नियंत्रित कागदी चलनाचा वापर व अवलंब सर्व राष्ट्रांना करावा लागला. परंतु त्यात त्यांना अपयश आले. चलन फुगवट्यामुळे चलन व्यवस्थेचे अवमूल्यन झाले. बँका, पतपेढ्या ह्यांचे दिवाळे निघाले. महागाई व बेकारीने सर्व युरोपभर थैमान घातले. जागतिक आर्थिक मंदिला जगाला तोंड द्यावे लागले. आर्थिक मंदी व महागाई यांचे संकट जगावर येऊन पडले. कामगारांची परिस्थिती अधिकच बिघडली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कामगार चळवळींना प्रारंभ झाला. थोडक्यात

या युद्धानंतर अर्थव्यवस्था पार डबघाईला आली.

**४) हुकूमशहांचा उदय** – महायुद्धानंतर झालेल्या व्हर्सायच्या तहाने जर्मनीवर अतिशय अपमानास्पद अटी लादल्या. महायुद्धासाठी जर्मनीला जबाबदार धरण्यात येऊन जर्मनीवर प्रचंड युद्ध नुकसान भरपाई लादण्यात आली. जर्मनीचा सुपीक प्रदेश दोस्त राष्ट्रांनी हिरावून घेतला. जर्मन लष्करावर व आरमारावर निर्बंध घातले. जर्मनीला पूर्णपणे खच्ची करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे जर्मनीच्या मनात दोस्त राष्ट्रांबद्दल सुडाची भावना निर्माण झाली. हा अपमानास्पद तह जर्मनीच्या प्रजासत्ताकाने मान्य केल्यामुळे प्रजासत्ताक सरकारविरूद्ध जर्मन जनतेत असंतोष निर्माण झाला. त्याप्रमाणे युद्धोत्तर काळातील समस्या प्रजासत्ताकाला सोडविता आल्या नाहीत. त्यामुळे जर्मनीमध्ये हिटलरसारख्या हुकूमशहाचा उदय झाला.

इटली हे राष्ट्र जरी महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या बाजूने लढले, तरी युद्धानंतर इटलीचा विशेष फायदा झाला नाही. या युद्धात इटलीचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्याठिकाणी युद्धानंतरच्या काळात अनेक आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण झाल्या होत्या. तेथील लोकशाही सरकार या समस्या सोडविण्यास असमर्थ ठरले. त्यामुळे तेथे मुसोलिनी या हुकूमशहाचा उदय झाला. याशिवाय स्पेनमध्ये जनरल फ्रँको, रशियामध्ये लेनिन, स्टॅलिन इत्यादी हुकूमशहा निर्माण झाले.

**५) राष्ट्रसंघाची स्थापना** – जगातील राष्ट्रा-राष्ट्रातील प्रश्न किंवा संघर्ष शांततेच्या मार्गाने मिटावेत. त्याचप्रमाणे जगामध्ये शांतता व सुरक्षितता निर्माण व्हावी,जगाला युद्धापासून परावृत्त करावे व युद्ध सुरु झाल्यास ते थांबविण्याचे उपाय योजावे या उद्देशाने राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली.

**६) अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय** – अमेरिका युद्धात उतरली व युद्धाचा रंग पालटला. अमेरिकेच्या मदतीमुळेचं दोस्त राष्ट्रे ही युद्ध जिंकू शकली. त्यामुळे अमेरिकेची प्रतिष्ठा खूप वाढली. युद्धामुळे युरोपातील आर्थिक परिस्थिती जरी कोलमडली, तरी अमेरिकेने अनेक राष्ट्रांना कर्ज देऊ केले होते. त्यामुळे सावकार राष्ट्र म्हणून अमेरिकेचा मान वाढला. अमेरिकन मालाची मागणी वाढली. अमेरिकन उद्योगधंद्यांचा विकास होण्यास त्यामुळे मदत झाली.

**७) आशियातील साम्राज्यवादाला जबर धक्का** – पहिल्या महायुद्धात

प्रकरण नववे

# हुकूमशाहीचा उदय

I) इटाली – फॅसिझमचा उदय आणि विकास
मुसोलिनीचे परराष्ट्रीय धोरण
II) जर्मनी – नाझीझमचा उदय आणि विकास
हिटलरचे परराष्ट्रीय धोरण

---

''मी आपल्या ड्यूसची (महान नेत्याची) आज्ञा बिनतक्रार पाळीन, फॅसिस्ट क्रांतीच्या महान कार्यासाठी माझ्या शक्तीनुसार प्रयत्न करीन व जरुर पडली तर माझ्या प्राणांचे व सर्वस्वाचे बलिदान करीन.''

– फॅसिस्ट सभासदांची प्रतिज्ञा.

## I) इटाली – (फॅसिझम)

### फॅसिझमचा उदय आणि विकास :–

पहिल्या महायुद्धकाळात जर्मनीने आरंभिलेल्या भयंकर विध्वंसामुळे लोकमत जर्मनीविरुद्ध खवळले आणि क्रांतिकारी पक्षाच्या बेनिटो मुसोलिनीनेही युद्धात इटलीने हस्तक्षेप करण्यास अनुकूलता दर्शवली. तसेच इटलीने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने भाग घेतल्यास इटलीस हवे असलेले प्रदेश मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले. परिणामी, १९१५ च्या लंडनच्या गुप्त तहान्वये युद्धात विजय मिळाल्यास इटलीस टिरोल, ट्रेन्टिनो, ट्रिस्ट, ऑस्ट्रिया, आग्नेय डाल्मेशिया, अडालिया व उत्तर आफ्रिकेतील वसाहती देण्याचे दोस्त राष्ट्रांनी मान्य केले. अशारितीने युद्धात भाग घेण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाल्यामुळे इटलीने पहिल्या महायुद्धात उडी घेतली. पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांना विजय मिळाला तरी युरोपातील इतर राष्ट्रांप्रमाणेच इटलीसह अनेक अंतर्गत व परराष्ट्रीय समस्यांना तोंड द्यावे लागले. इटलीतील प्रजासत्ताक सरकारला या समस्यांना समाधानकारकपणे हाताळता न

स्पेन व फ्रान्स यात वाटाघाटी चालू असता, तीन इटालियन युद्ध नौका तंजीयरच्या दिशेने रवाना करून, इटली हे भूमध्यसागरी राष्ट्र असल्याने तंजीयर संबंधीच्या वाटाघाटीत व निर्णयात इटलीला सहभागी करून घेण्यात आले पाहिजे, असा दावा मुसोलिनीने केला. शेवटी १९२८ च्या फेरव्यवस्थेनुसार त्या शहराच्या शासनयंत्रणेतही इटलीचा सहभाग मान्य करण्यात आला.

इटलीच्या इरिट्रीया व सोमालीलँड या वसाहतींमध्ये वसलेला इथिओपिया हा प्रदेश हस्तगत झाल्यास पूर्व आफ्रिकेत एक मोठा सलग प्रदेश इटलीच्या स्वामीत्वासाठी आला असता इटलीच्या आर्थिक समस्यांचे निराकारण होण्यासाठी त्यामुळे भरीव मदत होणार होती. १९३६ मध्ये मुसोलिनीने इथिओपियावर हल्ला केला व तो प्रदेश इटालियन साम्राज्याला जोडल्याची घोषणा केली.

अशाप्रकारे प्रादेशिक विस्ताराच्या इर्षेने पेटलेल्या मुसोलिनीने आक्रमक परराष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार केलेला दिसून येतो.

## II) जर्मनी (नाझीझम)

### ▸ नाझीझमचा उदय व विकास :-

'अनियंत्रित हुकूमशाही' व 'अतिरेकी राष्ट्रवाद' यांचे प्रतीक म्हणून जर्मनीत पहिल्या महायुद्धानंतर उदयास आलेली अॅडॉल्फ हिटरलची सत्ता व त्याने मांडलेली नाझीवादाची विचारसरणी यांचा उल्लेख केला जातो. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अवघ्या वीस वर्षांच्या काळात जगात पुन्हा दुसरे जागतिक महायुद्ध घडविण्यास नाझी भस्मासुराचा उदय कारणीभूत ठरला. जर्मन वंशश्रेष्ठत्वाच्या विचारांचा पुरस्कार करणाऱ्या हिटरलने लोकशाही परंपरा व प्रजासत्ताक शासन पद्धती दूर सारून अतिरेकी राष्ट्रवादाच्या विचारांनी जर्मन समाजाला प्रभावित केले.

### अ) नाझीझमच्या उदयाची कारणे :-

**१) व्हर्सायचा तह** – पॅरिस शांतता परिषदेत जर्मनीला कायमचे खच्ची कसे करता येईल. याचाच दोस्त राष्ट्रांनी सूड बुद्धीने विचार करून व्हर्सायचा अन्यायकारक तह लादला. त्यानुसार जर्मन लष्करात कपात केली. ऱ्हाईनचा प्रदेश नि:र्लष्करीकरण केला. अल्सेस व लॉरेन्स हे प्रांत फ्रान्सला दिले. विल्यम दुसऱ्यावर खटला भरवून जर्मनीवर युद्ध खंडणी लादण्यात आली. व्हर्साय तहातील अपमानास्पद

अटींमुळे जर्मनीचा स्वाभिमान दुखावला गेला. या अपमानाचा सूड घेण्याची जर्मनीने प्रतिज्ञा केली. याचा फायदा घेऊन हिटरलने लोकप्रियता मिळवली.

**२) वायमर प्रजासत्ताकाची अप्रियता** – पहिल्या महायुद्धामुळे जर्मन जनता आपल्या नेत्याच्या युद्धखोर प्रवृत्तीला विटली होती. म्हणून ९ नोव्हेंबर १९१८ च्या क्रांतीने जर्मन सम्राट विल्यम दुसरा याने पदत्याग केला. त्यानंतर १९ जानेवारी १९१९ रोजी झालेल्या निवडणुकात मेजॉरिटी सोशॅलिस्ट, सेंट्रिस्ट व डेमोक्रॅटिक पक्ष या तीन पक्षांचे मिळून संमिश्र मंत्रीमंडळ स्थापन करण्यात आले. फ्रेडरिक एबर्ट याची लोकसत्ताक जर्मन राष्ट्राचा पहिला अध्यक्ष म्हणून निवड झाली. नॅशनल असेंब्लीचे पहिले अधिवेशन वायमर या गावी भरविण्यात आले. त्यामुळे त्या सरकारला 'वायमर कोअलिशन' म्हणजे 'वायमरचे संमिश्र सरकार' असे संबोधण्यात येते. अशाप्रकारे होएन झोलर्न राज घराण्याचा शेवट होऊन प्रजासत्ताकाची स्थापना झाली.

वायमर प्रजासत्ताकाने तयार केलेली राज्यघटना ही जगातील पहिली लिखित राज्यघटना होय. व्हर्सायच्या तहाने जर्मनीवर अतिशय अपमानकारक अटी लादण्यात आल्या. या अटींचा स्वीकार करणे प्रजासत्ताकाला अपमानास्पद वाटत असले तरी अपरिहार्य होते. संपूर्ण नाशापासून जर्मनीचे रक्षण करण्याच्या भूमिकेतून प्रचंड मानसिक दबावाखाली हताश होवून या प्रजासत्ताकाने २८ जून १९१९ रोजी या तहावर स्वाक्षरी केली. या तहामुळे दोस्त राष्ट्रांविषयी द्वेषाची भावना जर्मन समाजात वाढत गेली व जर्मनीवर हा तह लादण्यास प्रजासत्ताकच कारणीभूत आहे, अशी भावना जनतेत रुजली.

**३) आर्थिक समस्या** – युद्धोत्तर काळात कच्च्या मालाचा पुरवठा होईनासा झाल्याने जर्मनीतील अनेक कारखाने बंद पडले. बेकारीची समस्या निर्माण झाली. प्रचंड महागाईमुळे सर्वसामान्य मनुष्याला जीवन जगणे अशक्य बनले. या आर्थिक समस्येवर उपाययोजना करण्यासाठी वायमर प्रजासत्ताकाने कागदी चलन वाढविले. तथापि, मोठ्या प्रमाणावर चलनफुगवटा झाल्याने कागदी चलनाची किंमत उतरण्यास सुरुवात झाली. आर्थिक समस्यांमुळे असंतुष्ट जर्मन समाजाने काऊंट कुनो याच्या मंत्रिमंडळाच्या राजीनाम्याची मागणी केली. यानंतर स्ट्रेसमनची चान्सलरपदी नियुक्ती झाली.

प्रकरण दहावे

# दुसरे जागतिक महायुद्ध

I) दुसरे जागतिक युद्ध – कारणे आणि परिणाम
II) संयुक्त राष्ट्र संघटना – उद्दिष्टे, संघटना, कामगिरी

---

''आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करणे, शांततेस निर्माण होणारे धोके थोपविण्याची व दुर करण्याची सामुदायिक उपाययोजना करणे, अतिक्रमणाची कृत्ये दडपून टाकणे आणि आंतरराष्ट्रीय वाद शांततामय मार्गाने मिटविणे ही संयुक्त राष्ट्र संघटनेची उद्दिष्टे आहेत.''

– संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद.

## I) दुसरे जागतिक युद्ध :-

भूतकाळातील चुकांची आता पुनरावृत्ती होणार नाही व कोणत्याही देशाला राक्षसी लष्करी सामर्थ्य उभे करू दिले जाणार नाही, अशी आशा पॅरिस शांतता परिषदेत व्यक्त करण्यात आली. तथापि, ती पूर्णपणे फोल ठरली. पहिल्या महायुद्धानंतर घडलेल्या घटनांमुळेच दुसरे महायुद्ध झाले. जर्मनीकडून युद्धातील नुकसान भरपाई वसूल करण्याचे फ्रेंचांचे ताठर धोरण, जागतिक मंदी, जपानच्या साम्राज्यवाद, मुसोलिनीला सुटलेली साम्राज्य स्थापन करण्याची हाव आणि जर्मनीत निर्माण झालेली हिटलरची हुकूमशाही या काही घटना अशा होत्या की, त्यामुळे १९१९ नंतर जी काही व्यवस्था निर्माण झाली होती ती पार धुळीला मिळाली. इंग्लंडने जे शांततवादी धोरण अंगीकारले त्यामुळे युद्धखोर आक्रमक देशांना उत्तेजनच मिळाले. त्यामुळे संपूर्ण आंतरराष्ट्रीय परिस्थिती भीतीदायक बनली आणि शेवटी १ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीने पोलंडवर आक्रमण केल्यामुळे दुसरे महायुद्ध सुरू झाले.

## अ) दुसऱ्या महायुद्धाची कारणे :-

**१) व्हर्साय करार** – व्हर्सायच्या तहानुसार सर्व वसाहती आणि त्याचबरोबर पोझेन, पोलिश, कॅरिडर, अप्पर सायलेशिया, डॅझिंग, युपेन, मालमेडी, मेमल, सार, बेसीन इत्यादी प्रदेशांवर व्हर्सायच्या तहामुळे जर्मनीला पाणी सोडावे लागले होते. त्याशिवाय, नुकसानभरपाई व युद्ध गुन्हेगारी यासारख्या मानहानीकारक कलमांमुळे जर्मन लोक संतापले. पराभवाचे व राष्ट्रीय अपमानाचे लांछन पुसून टाकणे आणि गमावलेले प्रदेशच केवळ नव्हे, तर त्याशिवायही जास्तीचे प्रदेश मिळवून जर्मनीची प्रतिष्ठा उंचावणे हे जर्मनीचे एकमेव ध्येय बनले.

**२) राष्ट्रसंघाचे दौर्बल्य** – पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय कलह सामोपचाराने सोडवून शांतता कायम टिकविण्याच्या उद्देशाने राष्ट्रसंघाची स्थापना झालेली होती. परंतु अमेरिकेसारख्या सामर्थ्यशाली राष्ट्राचा प्रारंभापासूनचा असहकार, सोविएत रशियासारख्या विशाल व उद्योन्मुख, आणि जर्मनीसारख्या पराभूत पण महत्वाकांक्षी राष्ट्रांना नाकारण्यात आलेले सदस्यत्व, प्रमुख दोस्त राष्ट्रांतील आपसातील मतभेद, यामुळे राष्ट्रसंघाचे भवितव्य सुरुवातीपासूनच अंधारले. १९३६ नंतर असंतुष्ट राष्ट्रांनी आक्रमक धोरणाला प्रारंभ केल्याने, राष्ट्रसंघाच्या सामूहिक सुरक्षितता तत्त्वाला दिल्या गेलेल्या आव्हानाला कणखरपणे तोंड देऊन आक्रमण थोपवून धरण्यात राष्ट्रसंघ सर्वस्वी असमर्थ ठरले.

**३) नि:शस्त्रीकरण परिषदांचे अपयश** – राष्ट्रसंघाच्या मूलभूत उद्देशामध्ये शस्त्रकपात व नि:शस्त्रीकरण यांना खास महत्त्व देण्यात आलेले होते. या उद्दिष्टानुसार जिनिव्हा करार १९२४, लंडन परिषद – १९३० आणि आंतरराष्ट्रीय नि:शस्त्रीकरण परिषद – १९३३ इत्यादी परिषदांमध्ये शस्त्रकपातीच्या व नि:शस्त्रीकरणाच्या प्रश्नांचा विचार झाला. पण या परिषदेत घेतलेल निर्णय जसे पक्षपाती होते, तसेच निर्णय मान्य करण्यासंबंधी टाळाटाळही होती. पहिल्या महायुद्धात पराभूत झालेल्या राष्ट्रांवरच शस्त्रकपात लादली. आपल्या शस्त्रवाढीवर बंधने लादली जात आहेत, असे दिसताच जर्मनीने नि:शस्त्रीकरण परिषदांतून अंग काढून घेतले.

**४) अल्पसंख्याकांचा असंतोष** – पॅरिसमधील करारामुळे जेव्हा विविध देशांच्या सीमा बदलल्या गेल्या तेव्हा विविध देशांमधील वेगवेगळ्या वंशांच्या लोकांचे देशही आपोआपच बदलले गेले. ऑस्ट्रिया जर्मनीपासून वेगळे करण्यात